नि.दि.दा. क्र.०४/२०१८
वंदना – वि.– बबन
**नि.क्र.६६**

**प्रतिवादीचा क्र.५ चा अधिकचा सरतपास श्री पी.एस.सायरे वकील साहेब मार्फत शपथेवर सुरुः**

१. मी माझ्या पुराव्याचे प्रतिज्ञापत्र **नि.क्र.६६** वर दाखल केला आहे त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर माझ्या सांगण्याप्रमाणे लिहीला असुन तो खरा व बरोबर आहे. मौजा साहोली येथील खसरा नं.१० आराजी १.६८ हे.आर. ही जमीन बबन रामाजी निंबोळकर याने मला विक्री करुन दिली आहे. आता मला अभिलेखावर दस्त यादी क्र.६९ सोबत दाखल केलेले विक्रीपत्राची झेरॉक्स प्रत दाखविण्यात आली. त्यावर माझी विक्रीपत्र लिहून घेणार म्हणून माझी सही आहे व विक्रीपत्र लिहून देणार म्हणून बबन रामाजी निंबोळकर यांची तसेच दोन साक्षीदारांच्या सह्या आहेत. त्यातील मजकूर बरोबर आहे. वादीने सदर दस्तास निशाणी देण्यास ना–हरकत दिल्याने त्यास **नि.क्र.७०** देण्यात येते.

**सरतपास पूर्ण.**

**वादीतर्फे श्री.डी.यू.ठाकरे वकील साहेब यांच्यामार्फत उलटतपास शपथेवर सुरुः**

२. मी केमीकल कंपनी, मुंबई येथे बीझनेस मॅनेजर या पदावर कार्यरत आहे. मी नि.क्र.७० नुसार वाद मिळकत खरेदी करतांना वृत्तपत्रात जाहीर नोटीस दिली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, वाद मिळकत खरेदी करतेवेळी सल्ला घेतला नाही. मी स्वतः सर्व दस्तांची पडताळणी करुन वाद मिळकत खरेदी केली. खरेदी करते वेळेस सण २००४ पूर्वीचे वाद मिळकतीचे ७/१२ उतारे पाहिले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.४५ वर माझे, बबन (प्रतिवादी क्र.१) व सकवारबाई हिचे नाव नमूद आहे. हे म्हणणे खरे नाही की, वाद मिळकतची खरेदी करतेवेळेस मला हे माहित होते की, वाद मिळकत ही, प्रतिवादी क्र.१ व सकवारबाईची एकत्रीत मिळकत आहे. हे म्हणणे खरे नाही की, वाद मिळकत ही, प्रतिवादी क्र.१ व वादी यांच्या मालकीचे होती हे मला माहित होते. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र.१ सोबत मिळून वाद मिळकत ही धोक्याने खरेदी केली. हे म्हणणे खरे आहे

की, वाद मिळकत खरेदी करण्याबाबत मी कधीही वादीस माहिती दिली नाही. हे म्हणणे खरे आहे की, कुठलीही वाद मिळकत खरेदी करताना दस्तांची पडताळणी करणे गरजेचे आहे. वाद मिळकत ही एकत्रीत कुटुंबाची मिळकत होती याबाबत मला सांगितले नव्हते. वादीचा वाद मिळकतीमध्ये हिस्सा होता किंवा नाही हे मला माहित नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृत**

GAJENDRA ONKARRAO WANKHADE

Digitally signed by GAJENDRA ONKARRAO WANKHADE
Date: 2025.03.17 17:46:17 +0530

**(जी.ओ. वानखडे)**
**दि.न्या. क. स्तर, पारशिवनी**

**समक्ष**

GAJENDRA ONKARRAO WANKHADE

Digitally signed by GAJENDRA ONKARRAO WANKHADE
Date: 2025.03.17 17:46:21 +0530

**(जी.ओ. वानखडे)**
**दि.न्या. क. स्तर, पारशिवनी**

**दिनांकः १७/०३/२०२५**